जा.क्र. माध्य ३-१३/ सीबीएसई नाहप्र/पुवि/१३ १४५६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक : 20 FEB 2013

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२.

विषय : सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई, सीआयई इत्यादी देशातील व विदेशातील मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होणा-या इंग्रजी माध्यमाच्या शाळांना कायम विना अनुदान तत्वावर परवानगी व नाहरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.

संदर्भ : १.संस्थापक सचिव, जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे यांचे पत्र जा.क्र. जेएसपीएम/ आस्था/स्कूल/२२२३/२०१२-१३ दिनांक १.११.२०१२
२.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग निर्णय क्रमांक नाहप्र/२००९/(६६३/०९) माशि-१ दिनांक २०.६.२०१२
३. शासन पत्र क्रमांक हेतूप-२०१२/४७/१२/ माशि-५ दि.२९.१०.२०१२

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्रमंक २ च्या शासन निर्णयानुसार अध्यक्ष, जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे या संस्थेस ब्लॉसम पब्लीक स्कूल (न्यू) सर्व्हे क्रमांक १२/२/२ मौजे न-हे ता.हवेली जि. पुणे ही सी.बी.एस.ई. मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नीत होणा-या कायम विनाअनुदानित तत्वावरील इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यासाठी आपणाकडील संदर्भ क्रमांक ३ च्या पत्रान्वये हेतूपत्र प्राप्त झाले आहे त्यानुसार दिनांक ९.२.२०१३ रोजी शाळेची तपासणी केलेली आहे.

शासन निर्णय दिनांक २०.६.२०१२ च्या तरतूदीनुसार शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत परिशिष्ट क नुसार माहिती सादर करण्यात येत आहे.

योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

सोबत : परिशिष्ट क नुसार शाळा तपासणी अहवाल

आपली विश्वासू

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

परिशिष्ट -ड

अभिप्राय :

आज दिनांक ९.२.२०१३ रोजी ब्लॉसम पब्लीक स्कूल (न्यू) सर्व्हे क्रमांक १२/२/२ मौजे न-हे ता.हवेली जि. पुणे हया सी.बी.एस.सी. माध्यमाची शाळेची तपासणी केली प्रस्तावित शाळेसाठी आवश्यक असलेली जागा ही संस्थेच्या मालकीची असून सी.बी.एस.सी. बोर्डाच्या नियमानुसार आवश्यक असणा-या जागेच्या उपलब्धतेनुसार आहे. शाळेच्या इमारतीमध्ये अध्यापक व भौतिक सुविधेनुसार वर्गखोल्या, ग्रंथालय कक्ष, प्रयोगशाळा, मुख्याध्यापक कक्ष, संगणक कक्ष व्यवस्थितरित्या बांधलेले असून स्वच्छतागृह पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व फर्निचर व्यवस्था आहे. सी.बी.एस.सी. अभ्यासक्रमासाठी आवश्यक अटी व शर्ती शाळा पूर्ण करीत असल्यामुळे शासन निर्णय क्रमांक नाहप्र (३६३/०९) माशि-१ दिनांक २० जुन २०१२ प्रमाणे शाळेस परवानगीसाठी ही समिती शिफारस करीत आहे.

| अ.क्र | नांव | हुददा | सही |
|---|---|---|---|
| १ | श्रीम.सुमन शिंदे | अध्यक्ष, विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे | |
| २ | श्रीम. डॉ.शोभा पवार | सदस्य संबंधित जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य | |
| ३ | श्री. धनाजी बुटे | शिक्षण उपनिरीक्षक, शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१. | |
| ४ | श्रीम. विनिता पुरी | सदस्य उपसंचालकांनी नामनिर्देशित केलेले सी.बी.एस.ई. संलग्नित शाळेचे प्राचार्य | |
| ५ | श्री.पी.व्ही. पाटील | उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे | |